# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१५** **दिनांक - ११/०१/२०२४**

## मोटर सायकल चोरी करणा-या आरोपीतांना अटक करुन वाहन चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस आणण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०१/०१/२०२४ रोजी ०५.०० वा चे सुमारास फिर्यादी हिदयाततुल्ला मकबुल अहमद खान वय ४३ वर्ष व्यवसाय- पत्रकार रा.रुम नं.०१,सिताबाई चाळ,रेणुका नगर,मौर्या सर्विस सेंटर, वाकण पाडा, पेल्हार, नालासोपारा पुर्व यांचे राहाते घराचे बाहेर पार्क करुन ठेवलेली रॉयल इनफिल्ड कंपनीची दुचाकी बुलेट मोटार सायकल अज्ञात आरोपीने चोरी केले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ०४/२०२४ कलम ३७९ भा.द.वि.स प्रमाणे दिनांक- ०१/०१/२०२४ रोजी १३.२१ वा नोंद करण्यात आला आहे. तसेच दिनांक- ०३/०१/२०२४ रोजी पहाटे ०५.०० वा चे सुमारास फिर्यादी फहिम अब्दुल कलाम पठाण वय २१ वर्ष धंदा - चिकन शॉप रा. मलिक चाळ बत्तीस एकर, वनोठा पाडा नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांचे राहाते घराचे बाहेर पार्क करुन ठेवलेली दुचाकी ॲक्टिवा मोटार सायकल अज्ञात आरोपीने चोरी केले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं- १३/२०२४ कलम ३७९ भा.द.वि.स प्रमाणे दिनांक- ०३/०१/२०२४ रोजी १६.०१ वा नोंद करण्यात आला आहे.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरीच्या घटनामध्ये वाढ झाली असल्याने वाहन चोरी करणा-या आरोपीताचा छडा लावुन त्यांना लवकरात लवकर जेरबंद करणे बाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्दे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकास सुचना देवुन आदेश दिले.

वर नमुद दोन्ही गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांनी तात्काळ नमुद गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहून त्याचे बारकाईने विश्लेषन करुन गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीचे आधारे दिनांक ०६/०१/२०२४ रोजी एक इसम हा तुंगार फाटा परिसरात बुलेट मोटर सायकल विक्री करण्याकरीता येणार असल्याची माहिती मिळाली असता तुंगारेश्वर फाटा येथे सापळा रचुन इसम नामे एहसानउल्ला मोहबतअली खान ऊर्फ सद्दाम वय- ३४ वर्षे, व्यवसाय-चालक, रा. शिळफाटा, ता.कल्याण, जि.ठाणे यांस ताब्यात घेवुन त्याचेकडे सखोल चौकशी करुन त्याचे कडुन एकुण एक बुलेट, एक युनिकॉर्न मोटार सायकल हस्तगत करण्यात आली. तसेच इसम परवेज शहमा खान वय- २६ वर्ष रा. नालेश्वर पाडा,नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर, यास ताब्यात घेवून त्याचेकडून एक दुचाकी ॲक्टीवा मोटर सायकल हस्तगत करण्यात करण्यात आली आहे. हस्तगत करणेत आलेल्या सदरच्या मोटार सायकली हया पेल्हार पो स्टे येथे दाखल असलेल्या गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोटार सायकली असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झालेले आहे. त्यांना अटक करणेत आलेली असुन नमुद आरोपीत यांचेकडून एकुण १,९०,०००/- रुपये

किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीतांकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

**१) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०४/२०२४ भादंविसं.कलम ३७९ प्रमाणे**

**२) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १३/२०२४ भादंविसं.कलम ३७९ प्रमाणे**

**३) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २८/२०२४ भादंविसं.कलम ३७९ प्रमाणे**

तसेच आरोपीत **एहसानउल्ला मोहबतअली खान ऊर्फ सद्दाम वय-३४ वर्षे**, हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द यापुर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहे.

१) वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.२६९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे.

२) वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.९१३/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे.

३) वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.१२३६/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे.

४) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.७९३/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे.

५) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.३९३/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे.

६) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.४६८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४,३८०,३४ प्रमाणे.

७) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.९०५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे.

८) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.७२५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोअं/संजय मासाळ, रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, दिलदार शेख, सुजय पाटील सर्व नेम पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा/ नामदेव ढोणे, पोअं/संतोष खेमनार, नेम-पोलीस उपायुक्त कार्यालय,परिमंडळ-३ विरार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

